Internal 8/9/1987
Decision of Madhu Mohite to quit YUKRAND

युवक क्रांती दल, महाराष्ट्र
शाही चेंबर्स, ९० सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
ता. ८ सप्टेंबर १९८९

प्रिय

क्रांतिकारक अभिवादन.

युवक क्रांती दलाचे पूर्णवेळ कार्यकर्ते व सहकार्यवाह मधु मोहिते यांनी दि. ३।९।८९ रोजी युक्रांद सोडण्याचा निर्णय घेतला आहे. युक्रांद कार्यकर्त्यांच्या पुणे येथे झालेल्या शिबिरात त्यांनी याविषयी आपली भूमिका मांडली. त्यातील काही महत्त्वाचे मुद्दे पुढीलप्रमाणे –

"कष्टकरी / दलितांचा क्रांतिकारक राजकीय पक्ष एकसंध नसल्यामुळे प्रमुख डाव्या पक्षांच्या कमतरता दाखवीत युक्रांद, दलित पँथर, मागोवा ग्रुप, भाकप (माले) ह्या संघटना निर्माण झाल्या. त्यांनी काही भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला.

.. प्रतीकात्मक आंदोलने विशिष्ट परिस्थितीत तडकावीच लागतात. अशा आंदोलनांचा राजकीय फायदा शिस्तबद्ध पक्ष / संघटनाच उठवू शकते. युक्रांदमध्ये तो अभाव होता व राहिला आहे.

.. युक्रांदने आपल्या तत्त्ववैचारिक भूमिकेचा विकास करण्यात अक्षम्य अशा चुका केलेल्या आहेत. अशा संघटनांना भौगोलिक मर्यादाही पडल्या.

.. बाहेरील राजकीय परिस्थिती आणि संघटनान्तर्गत वाटचाल पाहिली तर संघटनेला भवितव्य नाही असे वाटते — क्रांतिकारी राजकारण घडविण्यासाठी शिस्तबद्ध पक्षाचीच आवश्यकता असते."

बिगर संसदीय राजकीय संघटनांच्या समोर जरूर काही समस्या आहेत. परंतु या सर्व प्रक्रियेकडे मधु मोहिते ज्या भूमिकेतून पहात आहेत, त्या भूमिकेशी युक्रांद आजिबात सहमत नाही. राजकीय पक्षांच्या चौकटीबाहेर उदयाला आलेली युक्रांद ही राजकीय संघटना केवळ तात्कालिक 'प्रतिक्रिया' नव्हती. त्यामागे एक दीर्घ प्रक्रिया व ठोस 'राजकीय विचार' आहे. सत्ता, राजकीय पक्ष, जनता आणि सम्यक समाजवादी क्रांती यांच्याविषयी युक्रांदने निश्चित तत्त्ववैचारिक भूमिका मांडली आहे. ही सर्व प्रक्रिया समजून घेण्यात मधु मोहिते कमी पडले आहेत. प्रस्थापित संसदीय लोकशाही चौकट आणि सत्तेसाठी शिखरनीतीचे राजकारण यांच्या कोंडीत देशातील तमाम राजकीय पक्ष सापडले आहेत. प्रस्थापित उच्चवर्णीय / जातीय व भांडवलशाही हितसंबंधांचे रक्षण करणाऱ्या आजच्या राजकीय प्रक्रियेलाच 'क्रांतिकारक - परिवर्तनवादी राजकारण' मानण्याची घोडचूक मधु मोहिते करीत आहेत. परिणामी, ज्यांच्या मर्यादा गेल्या चाळीस वर्षांत स्पष्ट झाल्या आहेत, त्याच रुळलेल्या मार्गांनी जाऊन या देशात कष्टकरी, दलित, आदिवासी, भटके-विमुक्त, स्त्रिया आदी समाजघटकांचे क्रांतिकारक राजकारण करता येईल, हे म्हणणे भ्रामक व दिशाभूल करणारे आहे, तसेच स्वतःची सर्जनशीलता, उपक्रमशीलता गमावणेच होय. या भूमिकेचा युक्रांदने या कार्यकर्ता शिबिरात ठामपणे पुनरुच्चार केला, व मधु मोहिते यांची भूमिका व संघटनेवरील आक्षेप एकमताने फेटाळून लावले.

आजपर्यंत झालेल्या चर्चा, वैचारिक चिंतन व लेखनाची योग्य दखल घेऊन यापुढील काळात 'सद्य राजकीय स्थिती व बिगर संसदीय संघटनांचे स्थान' यावर व्यापक स्वरुपात चर्चा घडवून आणण्याचा निर्णय दि. ७ मे '८९ रोजी पुणे येथे झालेल्या युक्रांदच्या वार्षिक शिबिरात घेण्यात आला आहे. बिगरसंसदीय संघटनांसमोर व आजच्या क्रांतिकारी चळवळीसमोर असलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची व त्या शक्तींची एकजूट उभारून ती प्रभावी करण्याची गरज युक्रांदला वाटते. त्यासाठी महाराष्ट्रातील व देशातील सम-विचारी संघटनांशी खराखुरा संवाद करण्याचा प्रयत्न युक्रांद करत आहे.

युक्रांद व तिच्या सर्व जन-वर्गीय आघाड्यांवर आपण कार्यरत असतानाच व्यापक स्वरूपाच्या संवादप्रक्रियेत आपणाला सहभागी व्हायचे आहे. यासंबंधीचे टिपण लवकरच आपणाकडे पाठविण्यात येईल. प्रत्येक स्थानिक केंद्राने आपल्या कार्यकर्त्यांच्या बैठका आयोजित करा‌व्यात. या बैठकींना पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य उपस्थित राहतील.

सर्वांना क्रांतिकारक अभिवादन.

आपले,

अजित सरदार

(शांताराम पंदेरे)
कार्यवाह, युक्रांद, महाराष्ट्र